-----------------------------------------------------------------------------------------------------------

## श्री.विठ्ठल सेवक योजना २०२३

श्री.संत गजानन महाराज संस्थान, शेगांव व श्री.साईबाबा संस्थान, शिर्डी या देवस्थानच्या धर्तीवर श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरमध्ये "विठ्ठल सेवक" म्हणून भाविकांना विनामूल्य सेवा करण्याची संधी देण्याबाबत "श्री.विठ्ठल सेवक योजना २०२३ राबविणेबाबत.

-----*****-----

**श्री.विठ्ठल सेवक योजनेचे स्वरूप :-**

"विठ्ठल सेवक" योजनेमध्ये ०७ व्यक्तीचा ०१ गट तयार करण्यात आला असून, रविवार ते शनिवार ०१ गट काम करेल असे एका आठवड्यात सकाळी ६.०० ते दुपारी २.०० व दुपारी २.०० ते रात्री १०.०० व रात्री १०.०० ते सकाळी ६.०० यावेळेत आठवडाभर सेवा देतील. तसेच एका सेवकांला एकापेक्षा अधिक गटांमध्ये नोंदणी करता येणार आहे.

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर मार्फत अशा गटांना मंदिर समितीच्या विविध ठिकाणी सेवेची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार असून काही गटांना वर्षातून एका पेक्षा जास्त वेळा सेवेची इच्छा असेल तर त्यांना वर्षातून एका पेक्षा जास्त वेळेस सलग ०७ दिवस सेवेची संधी देण्यात येणार आहे. या गटांना प्रथम गोशाळा, भक्तनिवास, अन्नछत्र, दर्शनरांगेतील स्वच्छता, दर्शनरांग द्रुतगतीने चालविणे, परिवार देवता मंदिरे व इतर अनुषंगीक ठिकाणी वर्षातून सलग ७ दिवस सेवेची संधी दिली जाईल.

सेवकांना जबाबदारीने, सभ्यभावनेने व सेवाभावी वृत्तीने येणा-या वारकरी भाविकांचा आदर करून, सन्मान करून "जय हरी" म्हणून वारकरी भाविकांच्या अडचणी सोडविण्याचे काम तसेच मंदिर समितीचे अधिकारी / वरिष्ठ कर्मचारी नेमूण देतील ती कामे सेवकांनी करावयाची आहेत.

**महत्वाच्या सुचना :-**

१) स्वयंसेवकाने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात "**श्री.विठ्ठल सेवक योजना**" अंतर्गत सेवेसाठी अर्ज असे नमुद करुन कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि.सोलापूर -४१३३०५ या पत्यावर पोहचेल याची दक्षता घेवून सादर करावा.

२) अपूर्ण माहिती असलेले अर्ज रद्द ठरविले जातील व याबाबत फेरविचार केला जाणार नाही म्हणून अर्ज सादर करतांना योग्य ती दक्षता घ्यावी.

३) अर्ज पोष्टाने किंवा श्री.संत तुकाराम भवन, पंढरपूर येथील कार्यालयात समक्ष सादर करता येतील.

४) यापूर्वी सादर केलेले अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत.

५) माहिती, अर्जाचा नमुना, अटी व शर्ती मंदिर समितीच्या https://www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६) अर्जदार भारतीय नागरिक असावा.

**सेवेचे मानधन व प्रवास खर्च :-** सदरची सेवा सेवाभावी तत्वावर मोफत असल्याने कोणत्याही प्रकारचे मानधन व इतर कोणत्याही स्वरूपाचे भत्ते तसेच प्रवास खर्च अदा करण्यात येणार नाही. तसेच सदरची सेवा पूर्णत: विनामुल्य राहील.

**कर्तव्य व जबाबदा-या :-** अन्नछत्रामध्ये भोजन प्रसाद तयार करणे व वाटप करणे, चप्पल स्टँड, मोबाईल लॉकर, दर्शनरांगेत भाविकांची तपासणी, गोशाळेतील स्वच्छता, दर्शनरांग द्रुतगतीने चालविण्यासाठी सुरक्षा रक्षकांना मदत करणे, स्वच्छता करणे, दर्शनरांगेत चहा-पाणी वाटप करणे, मंदिरातील निर्माल्य उचलणे व इतर अनुषंगीक सेवा करणे.

**माहिती, अटी, शर्ती, सवलती :-**

१) स्वयंसेवकांचे वय कमीत कमी १८ वर्ष व जास्तीतजास्त ६० वर्ष असणे आवश्यक आहे.

२) ओळखीचा पुरावा म्हणून आधारकार्ड / मतदान ओळखपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) आपलेकडील स्वयंसेवकांची निवास व भोजन व्यवस्था श्री. संत तुकाराम भवन येथे करण्यात येईल.

४) सदरची सेवा ही शारिरीक कष्टाची असल्याने, स्वयंसेवक शारिरीक प्रकृतीने सदृढ व सशक्त आरोग्य असणारा असावा. सेवा कालावधीत त्यांना इजा अथवा इतर कोणत्याही दुर्घटना झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी स्वयंसेवकाची राहील. तसेच स्वयंसेवक गुन्हेगार प्रवृत्तीचा व व्यसनी नसावा.

५) किमान ७ दिवस सेवा करण्याची तयारी असावी. यापेक्षा कमी कालावधीच्या सेवेकरिता अर्ज करता येणार नाही.

६) स्वयंसेवकांला श्रीच्या दर्शनासाठी विनापरवानगी जाता येणार नाही. तसेच त्यांनी त्यांचेकडील नातेवाईक श्रीच्या दर्शनासाठी आणू नयेत. तसे घडल्यास कारवाईस पात्र रहाल. सेवक यांना सेवेच्या कालावधीतच फक्त मोफत दर्शनाची सुविधा पुरविण्यात येईल. (दर्शन व्यवस्था ही जी व्यक्ती सेवक म्हणुन सेवा देईल, अशा व्यक्तीलाच स्वतःसाठी देणेत येईल. त्यांचेसमवेत असलेल्या इतर व्यक्तींना सदरची सुविधा देणेत येणार नाही)

७) सेवकांनी सेवाभवी वृत्तीने मंदिर समितीच्या विभागात स्वत:चे इच्छेने सेवा देणेचे अथवा काम करण्याचे मान्य केले आहे.

८) सेवकांच्या गट प्रमुख यांनी सेवेला आल्यांनंतर दररोज सकाळी ६.०० ते दुपारी २.०० व दुपारी २.०० ते रात्री १०.०० व रात्री १०.०० ते सकाळी ६.०० वेळेत संबंधीत विभागाशी संपर्क साधावा अथवा विभाग प्रमुख जी वेळ नेमुण देतील त्या वेळेत संबंधीत विभागांशी संपर्क साधावा. तसेच आवश्यक भासेल तेंव्हा जादा वेळ सेवा करणे आवश्यक आहे.

९) सेवकांना नेमूण दिलेल्या विभागात / ठिकाणी व नेमूण दिलेल्या वेळेत बिना तक्रार सेवा करावी लागेल. ठरावीक ठिकाणीच सेवा मिळणे बाबतचा सेवकांना आग्रह धरता येणार नाही. सेवकांना सेवा देतांना सेवेशी संबंधीत विभागाचे विभाग प्रमुख यांचे पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली सेवा देणेचे काम करावे लागेल.

१०) सेवेचे कालावधीत सेवकाकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन अथवा अनुचित प्रकार, घटना, बेशिस्त वर्तन घडल्यास किंवा सेवेचे दरम्यान भोंदुगिरी, अंधश्रधेला खतपाणी घालणे सारखी कृती घडल्यास सेवका विरुध्द पंढरपूर शहर पोलीस स्टेशनमध्ये रितसर गुन्हा अथवा (F.I.R.) दाखल करणेत येईल,

११) सेवकांना मंदिर समितीचा कर्मचारी म्हणून दर्जा प्राप्त होणार नाही. तसेच त्यांना कोणताही मोबदला मागता येणार नाही. अथवा मंदिर समितीमध्ये नोकरीसाठी हक्क सांगता येणार नाही.

१२) सेवकांना मंदिर समितीमध्ये सेवकाची सेवा दिलेली आहे म्हणून त्यांना अग्रहक्काने कोणतेही लाभ - फायदे घेता येणार नाही. तो इतर वारकरी भक्तासारखाच राहील.

१३) मंदिर समिती कोणतेही कारण न देता कोणत्याही सेवकास या योजनेतून काढून टाकण्याचा निर्णय घेईल. तो निर्णय सेवकावर बंधनकारक राहील.

१४) सदर सेवक नियमावलीमध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार, मंदिर समितीला असेल.

१५) सेवकास जी संधी प्रथम दिली जाईल, त्यावेळी त्याने ती संधी चुकविली तर पुन्हा त्यास सेवक म्हणुन सेवा करण्याची भविष्यात कोणतीही संधी दिली जाणार नाही.

१६) सेवकांचे कपडे नेहमी स्वच्छ असावे तसेच त्यांनी दाढी व कटींग केलेली व बोटांची नखे काढलेली असावीत.

१७) सेवेसाठी नेमलेल्या सेवकांना सेवेच्या ठिकाणी पान, तंबाखु, बिडी, सिगारेट, गुटखा पुडी मावा खाण्यास सक्त मनाई आहे. तसेच त्यांनी मंदिर परीसरात मद्यपान, अंमली पदार्थाचे सेवन करू नये.

१८) सेवेस येतांना सेवकांनी मोबाईल व इतर मौल्यवान वस्तु सोबत आणु नये, मोबाईल दिसल्यास जमा करण्यात येईल.

१९) सेवेक-यांने नेमुन दिलेल्या सेवेच्या ठिकाणा व्यतिरीक्त सेवा सोडुन गेटच्या बाहेर जाऊ नये, जाणे जरूरी असल्यास मंदिर समितीचे विभाग प्रमुख व गट प्रमुख यांना विचारून तसेच ओळखपत्र काढुनच बाहेर जावे.

२०) सेवा चालु असतांना सेवकांनी एकत्र बसून गप्पा मारू नये.

२१) सेवक प्रमुखाने सेवेच्या ठिकाणी स्वत: हजर राहून सेवकांकडुन व्यवस्थीत सेवा करून घ्यावी.

२२) सेवक प्रमुखांनी सेवेच्या ठिकाणी दिलेल्या सुचनांचे व्यवस्थीत व काटेकोरपणे पालन करावे,

२३) सेवकांनी सेवेच्या ठिकाणी उत्तम स्वच्छता राखली जाईल याची दक्षता घ्यावी. सेवकांनी सेवेत नसतांनी ही व्यवस्थीत शिस्तीने वागावे, मोठ्याने चर्चा करु नये व गप्पा मारू नयेत.

२४) गावातील राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारचे वादात सेवेक-यांने सहभाग घेवु नये अथवा सेवेला आल्यांनंतर कोणताही वाद निर्माण करु नये.

२५) सेवा करतांना सेवकांनी भाविकांशी प्रेमाणे "जय हरी" म्हणुन चांगले व नम्रपणे आचरण ठेवावे, त्यांना मोठ्याने आवाज देवु नये व त्यांना आवश्यक ती मदत करावी व त्यांनी काही विचारल्यास त्यांना योग्य सल्ला द्यावा.

२६) सेवकांना मंदिर समितीच्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

२७) सेवकाने कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास त्यास तात्काळ सेवेच्या ठिकाणावरुन हाटविले जाईल व त्यास भविष्यात कधीही सेवक म्हणून सेवा करण्याचा अधिकार राहणार नाही.

२८) सेवक योजना कोणतेही कारण न देता अथवा पूर्व सूचना न देता सेवा बंद करण्याचा अधिकार, मंदिर समितीला राहील.

२९) सेवेच्या कालावधीत घडलेल्या कोणत्याही कृतीसाठी घटनेसाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मंदिर समितीकडे मागता येणार नाही.

३०) सेवेचा कालावधी संपल्यानंतर मंदिर समितीने दिलेले ओळखपत्र तात्काळ संबंधित विभागात जमा करावयाचे आहे. त्याचा दुरूपयोग होणार नाही याची दक्षता सेवकांनी घ्यावयाची आहे.

३१) सेवकाने सेवक म्हणून सेवा करताना काही गैरप्रकार केले तर ती त्याची वैयक्तिक बाब समजुन त्याचेवर योग्य ती कारवाई मंदिर समिती करेल. याबाबत होणा-या परिणामांशी मंदिर समितीचा काहीही संबंध राहणार नाही.

३२) सेवकांचे स्वत:चे कृतीने अथवा निष्काळजीपणाने काही अपघात, इजा अगर गंभीर दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी मंदिर समिती घेणार नाही. सदर जबाबदारी सर्वस्वी सेवकाची राहील.

३३) सेवक योजनेमध्ये स्वच्छेने सहभागी होणा-या सेवकास सेवेच्या कालावधीमध्ये मंदिर समिती मार्फत ओळखपत्र देण्यात येईल. सेवा समाप्त झालेनंतर सदर ओळखपत्र सेवकांनी तात्काळ संबंधित विभागात जमा करावे.

३४) सदर नियमावली मान्य असलेबाबत विहित नमुन्यातील स्वयं शपथपत्र सेवा सुरु करणेपूर्वी स्वाक्षरी करून जमा केले नंतरच सेवक म्हणून नेमणूक करणेत येईल.

३५) सेवेचा कालावधी मंदिर समिती मार्फत निश्चित करून देण्यात येईल, त्या कालावधी नेमूण दिलेले सेवा करणे आवश्यक आहे.

३६) सदर नियुक्तीद्वारे मंदिर समितीकडे कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.

३७) अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे (Passport Size Photo) सध्याचे काढलेले दोन रंगीत फोटो जोडावेत.

३८) सेवा मध्येच खंडीत करावयाची असल्यास तशी पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे, अचानक सेवा सोडता येणार नाही. अचानक सेवा सोडणा-या स्वयंसेवकांना पून्हा सेवेचा लाभ देता येणार नाही.

३९) सेवेची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ सेवा खंडीत करण्याचा अधिकार, कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना राहील.

४०) सेवा समाप्तीचे सर्व अधिकार हे कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना असतील.

४१) प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द करण्याचा अधिकारी मंदिर समितीने राखून ठेवला आहे.

---

**पत्रव्यवहाराचा पत्ता व संपर्क क्रमांक**

**कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर — ४१३३०५.**

**संपर्क क्रमांक — ०२१८६-२२४४६६/२२३५५०.**

**ईमेल :- eotemple@gmail.com**

**संकेतस्थळ :- https://www.vitthalrukminimandir.org**

---

**-: अर्जाचा नमुना :-**

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरकडे सेवाभावी तत्वावर मोफत सेवा करण्यासाठीचा अर्ज**

----------//-----------

**गट प्रमुखाची वैयक्तिक माहिती :-**

**१. संपूर्ण नांव :-** आडनाव नाव वडीलांचे / पतीचे नाव

------------------------------------------------------------------------------

**२. पत्रव्यवहाराचा पत्ता :-** ------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

पिनकोड -----------------------------------------------------------------------

**३. दूरध्वनी क्रमांक :-** लॅन्डलाईन------------------------- भ्रमणध्वनी-------------------------------

ई-मेल ------------------------------------------------------------------------

**४. स्वयंसेवकांचा तपशिल :-**

| अ.क्र. | नाव | पदनाम | लिंग | वय |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ०१ | | गट प्रमुख | | |
| ०२ | | स्वयंसेवक | | |
| ०३ | | स्वयंसेवक | | |
| ०४ | | स्वयंसेवक | | |
| ०५ | | स्वयंसेवक | | |
| ०६ | | स्वयंसेवक | | |
| ०७ | | स्वयंसेवक | | |

**ठिकाण :-** **अर्जदाराची सही**

**दिनांक :-** **नांव व दिनांकासह**

**सोबत:-** गट प्रमुखासह सर्व स्वयंसेवकांच्या आधारकार्ड / मतदानकार्डची स्वयंसाक्षांकित छायांकित प्रत, प्रत्येकी दोन पासपोर्ट साईज (फोटोच्या मागे मार्कर पेनने नाव लिहावे) फोटो व गट प्रमुखाचे विहित नमुन्यातील स्वयंशपथ पत्र.

## श्री.विठ्ठल सेवक योजना २०२३ – स्वयं शपथपत्र

मी श्री./श्रीमती ---------------------------------------------------------- , वय --------- वर्षे, श्री.विठ्ठल रूक्मिणी देवतांना स्मरून प्रकट निवेदन करतो की, मी श्री.विठ्ठल व रूक्मिणीमाता या देवतांचा भक्त आहे. मी श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे श्री.विठ्ठल सेवक योजना २०२३ अंतर्गत विनामुल्य सेवा मिळणेकामी अर्ज सादर करीत असून, त्याबाबतच्या खालील अटी व शर्तींना मी मान्यता देत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. सदरची सेवा सेवाभावी तत्वावर मोफत असल्याने कोणत्याही प्रकारचे मानधन व इतर कोणत्याही स्वरूपाचे भत्ते तसेच प्रवास खर्च अदा करण्यात येणार नाही.

२. अन्नछत्रामध्ये भोजन प्रसाद तयार करणे व वाटप करणे, चप्पल स्टँड, मोबाईल लॉकर, दर्शनरांगेत भाविकांची तपासणी, गोशाळेतील स्वच्छता, दर्शनरांग द्रुतगतीने चालविण्यासाठी सुरक्षा रक्षकांना मदत करणे, स्वच्छता करणे, दर्शनरांगेत चहा-पाणी वाटप करणे, मंदिरातील निर्माल्य उचलणे व इतर अनुषंगीक सेवा करणे.

३. स्वयंसेवकांचे वय कमीत कमी १८ वर्ष व जास्तीतजास्त ६० वर्ष असणे आवश्यक आहे.

४. ओळखीचा पुरावा म्हणून आधारकार्ड / मतदान ओळखपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. स्वयंसेवकांची निवास व भोजन व्यवस्था श्री. संत तुकाराम भवन येथे करण्यात येईल.

६. सदरची सेवा ही शारिरीक कष्टाची असल्याने, स्वयंसेवक शारिरीक प्रकृतीने सदृढ व सशक्त आरोग्य असणारा असावा. सेवा कालावधीत त्यांना इजा अथवा इतर कोणत्याही दुर्घटना झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी स्वयंसेवकाची राहील. तसेच स्वयंसेवक गुन्हेगार प्रवृत्तीचा व व्यसनी नसावा.

७. किमान ७ दिवस सेवा करण्याची तयारी असावी. यापेक्षा कमी कालावधीच्या सेवेकरिता अर्ज करता येणार नाही.

८. स्वयंसेवकांला श्रीच्या दर्शनासाठी विनापरवानगी जाता येणार नाही. तसेच त्यांनी त्यांचेकडील नातेवाईक श्रीच्या दर्शनासाठी आणू नयेत. तसे घडल्यास कारवाईस पात्र रहाल. सेवक यांना सेवेच्या कालावधीतच फक्त मोफत दर्शनाची सुविधा पुरविण्यात येईल. (दर्शन व्यवस्था ही जी व्यक्ती सेवक म्हणुन सेवा देईल, अशा व्यक्तीलाच स्वतःसाठी देणेत येईल. त्यांचेसमवेत असलेल्या इतर व्यक्तींना सदरची सुविधा देणेत येणार नाही)

९. सेवकांनी सेवाभवी वृत्तीने मंदिर समितीच्या विभागात स्वतःचे इच्छेने सेवा देणेचे अथवा काम करण्याचे मान्य केले आहे.

१०. सेवकांच्या गट प्रमुख यांनी सेवेला आल्यांनंतर दररोज सकाळी ६.०० ते दुपारी २.०० व दुपारी २.०० ते रात्री १०.०० व रात्री १०.०० ते सकाळी ६.०० वेळेत संबंधीत विभागाशी संपर्क साधावा अथवा विभाग प्रमुख जी वेळ नेमुण देतील त्या वेळेत संबंधीत विभागांशी संपर्क साधावा. तसेच आवश्यक भासेल तेंव्हा जादा वेळ सेवा करणे आवश्यक आहे.

११. सेवकांना नेमूण दिलेल्या विभागात / ठिकाणी व नेमूण दिलेल्या वेळेत बिना तक्रार सेवा करावी लागेल. ठरावीक ठिकाणीच सेवा मिळणे बाबतचा सेवकांना आग्रह धरता येणार नाही. सेवकांना सेवा देतांना सेवेशी संबंधीत विभागाचे विभाग प्रमुख यांचे पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली सेवा देणेचे काम करावे लागेल.

१२. सेवेचे कालावधीत सेवकाकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन अथवा अनुचित प्रकार, घटना, बेशिस्त वर्तन घडल्यास किंवा सेवेचे दरम्यान भोंदुगिरी, अंधश्रधेला खतपाणी घालणे सारखी कृती घडल्यास सेवका विरुध्द पंढरपूर शहर पोलीस स्टेशनमध्ये रितसर गुन्हा अथवा (F.I.R.) दाखल करणेत येईल,

१३. सेवकांना मंदिर समितीचा कर्मचारी म्हणून दर्जा प्राप्त होणार नाही. तसेच त्यांना कोणताही मोबदला मागता येणार नाही. अथवा मंदिर समितीमध्ये नोकरीसाठी हक्क सांगता येणार नाही.

१४. सेवकांना मंदिर समितीमध्ये सेवकाची सेवा दिलेली आहे म्हणून त्यांना अग्रहक्काने कोणतेही लाभ - फायदे घेता येणार नाही. तो इतर वारकरी भक्तासारखाच राहील.

१५. मंदिर समिती कोणतेही कारण न देता कोणत्याही सेवकास या योजनेतून काढून टाकण्याचा निर्णय घेईल. तो निर्णय सेवकावर बंधनकारक राहील.

१६. सदर सेवक नियमावलीमध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार, मंदिर समितीला असेल.

१७. सेवकास जी संधी प्रथम दिली जाईल, त्यावेळी त्याने ती संधी चुकविली तर पुन्हा त्यास सेवक म्हणुन सेवा करण्याची भविष्यात कोणतीही संधी दिली जाणार नाही.

१८. सेवकांचे कपडे नेहमी स्वच्छ असावे तसेच त्यांनी दाढी व कटींग केलेली व बोटांची नखे काढलेली असावीत.

१९. सेवेसाठी नेमलेल्या सेवकांना सेवेच्या ठिकाणी पान, तंबाखु, बिडी, सिगारेट, गुटखा पुडी मावा खाण्यास सक्त मनाई आहे. तसेच त्यांनी मंदिर परीसरात मद्यपान, अंमली पदार्थाचे सेवन करू नये.

२०. सेवेस येतांना सेवकांनी मोबाईल व इतर मौल्यवान वस्तु सोबत आणु नये, मोबाईल दिसल्यास जमा करण्यात येईल.

२१. सेवेक-यांने नेमुन दिलेल्या सेवेच्या ठिकाणा व्यतिरीक्त सेवा सोडुन गेटच्या बाहेर जाऊ नये, जाणे जरूरी असल्यास मंदिर समितीचे विभाग प्रमुख व गट प्रमुख यांना विचारून तसेच ओळखपत्र काढुनच बाहेर जावे.

२२. सेवा चालु असतांना सेवकांनी एकत्र बसून गप्पा मारू नये.

२३. सेवक प्रमुखाने सेवेच्या ठिकाणी स्वत: हजर राहून सेवकांकडुन व्यवस्थीत सेवा करून घ्यावी.

२४. सेवक प्रमुखांनी सेवेच्या ठिकाणी दिलेल्या सुचनांचे व्यवस्थीत व काटेकोरपणे पालन करावे,

२५. सेवकांनी सेवेच्या ठिकाणी उत्तम स्वच्छता राखली जाईल याची दक्षता घ्यावी. सेवकांनी सेवेत नसतांनी ही व्यवस्थीत शिस्तीने वागावे, मोठ्याने चर्चा करु नये व गप्पा मारू नयेत.

२६. गावातील राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारचे वादात सेवेक-यांने सहभाग घेवु नये अथवा सेवेला आल्यांनंतर कोणताही वाद निर्माण करु नये.

२७. सेवा करतांना सेवकांनी भाविकांशी प्रेमाणे "जय हरी" म्हणुन चांगले व नम्रपणे आचरण ठेवावे, त्यांना मोठ्याने आवाज देवु नये व त्यांना आवश्यक ती मदत करावी व त्यांनी काही विचारल्यास त्यांना योग्य सल्ला द्यावा.

२८. सेवकांना मंदिर समितीच्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

२९. सेवकाने कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास त्यास तात्काळ सेवेच्या ठिकाणावरुन हाटविले जाईल व त्यास भविष्यात कधीही सेवक म्हणून सेवा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३०. सेवक योजना कोणतेही कारण न देता अथवा पूर्व सूचना न देता सेवा बंद करण्याचा अधिकार, मंदिर समितीला राहील.

३१. सेवेच्या कालावधीत घडलेल्या कोणत्याही कृतीसाठी घटनेसाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मंदिर समितीकडे मागता येणार नाही.

३२. सेवेचा कालावधी संपल्यानंतर मंदिर समितीने दिलेले ओळखपत्र तात्काळ संबंधित विभागात जमा करावयाचे आहे. त्याचा दुरूपयोग होणार नाही याची दक्षता सेवकांनी घ्यावयाची आहे.

३३. सेवकाने सेवक म्हणून सेवा करताना काही गैरप्रकार केले तर ती त्याची वैयक्तिक बाब समजुन त्याचेवर योग्य ती कारवाई मंदिर समिती करेल. याबाबत होणा-या परिणामांशी मंदिर समितीचा काहीही संबंध राहणार नाही.

३४. सेवकांचे स्वत:चे कृतीने अथवा निष्काळजीपणाने काही अपघात, इजा अगर गंभीर दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी मंदिर समिती घेणार नाही. सदर जबाबदारी सर्वस्वी सेवकाची राहील.

३५. सेवक योजनेमध्ये स्वच्छेने सहभागी होणा-या सेवकास सेवेच्या कालावधीमध्ये मंदिर समिती मार्फत ओळखपत्र देण्यात येईल. सेवा समाप्त झालेनंतर सदर ओळखपत्र सेवकांनी तात्काळ संबंधित विभागात जमा करावे.

३६. सेवेचा कालावधी मंदिर समिती मार्फत निश्चित करून देण्यात येईल, त्या कालावधी नेमूण दिलेले सेवा करणे आवश्यक आहे.

३७. सदर नियमावली मान्य असलेबाबत विहित नमुन्यातील स्वयं शपथपत्र सेवा सुरु करणेपूर्वी स्वाक्षरी करून जमा केले नंतरच सेवक म्हणून नेमणूक करणेत येईल.

३८. सदर नियुक्तीद्वारे मंदिर समितीकडे कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.

३९. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे (Passport Size Photo) सध्याचे काढलेले दोन रंगीत फोटो जोडावेत.

४०. सेवा मध्येच खंडीत करावयाची असल्यास तशी पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे, अचानक सेवा सोडता येणार नाही. अचानक सेवा सोडणा-या स्वयंसेवकांना पून्हा सेवेचा लाभ देता येणार नाही.

४१. सेवेची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ सेवा खंडीत करण्याचा अधिकार, कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना राहील.

४२. सेवा समाप्तीचे सर्व अधिकार हे कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना असतील.

**ठिकाण :-** **अर्जदाराची सही**

**दिनांक :-** **नांव व दिनांकासह**